# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 17/12/2019 (मंगळवार)
# (सकाळ)

---

## घरफोडी

1) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 7 कि. मी. अंतरावर मौजा काचुरवाही येथे दिनांक 16/12/2019 चे 11.00 वा. ते 17.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– माया बबलु डोकिरमारे, रा. काचुरवाही व मुलगी घरचा दरवाजा टेकुन शेतीच्या कामावर गेले. दरम्यान अज्ञात आरोपीने घरात प्रवेश करून गोदरेज आलमारीचे लॉकर तोडुन त्या मधील नगदी 9,000/–रू. व सोन्याचे दागिने कि. 20,000/–रू. असा एकुण 29,000/–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अजय इंगळे हे करीत आहे.

2) पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 5 कि. मी. अंतरावर तीरखुरा उमरेड शिवार येथे दिनांक 16/12/2019 चे 01.00 वा. ते 02.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ज्ञानेश्वर गोवींदराव चौधरी वय 37 रा मिरे ले आउट वार्ड क्र 22शितला माता मंदीर नागपूर यांचे शेतात असलेल्या टिनाचे घरातील कुलूप अज्ञात आरोपीने तोडुन 14 क्विंटल कापुस कि. कि 70,000 /–रु. चा मुद्देमाल चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 461, 380 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक हरिष यंगलवार हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 25 कि.मी अंतरावर मौजा पाचगाव येथे दिनांक 15/12/2019 चे 17.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– जितेन्द्र हिरामन हटवार, वय 32 वर्ष, रा. पाचगाव ता. उमरेड हे ग्रामपंचायत चौकात वाघमारेच्या पानठेल्या जवळ गप्पा गोश्टी करित असतांना जुन्या वादाच्या कारणावरून आरोपी क्र. 1) शुभम हटवार, 2) रामाजी हटवार, 3) मंगेश हटवार, 4) गोलु हटवार, 5) वैभव हटवार, 6) पुरूषोत्म हटवार, 7) गजानन थोटे, 8) मंगेश हटवारची पत्नी 9) रामाजी हटवारची पत्नी, 10) बबलु हटवार, 11) बबलु हटवारची पत्नी व इतर 10 ते 12 अनोळखी पुरूष, सर्व रा. पाचगाव त. उमरेड जि. नागपुर यांनी गैरकायदयाची मंडळी गोळा करून फिर्यादी व फिर्यादीच्या नातेवाईकांना तलवारीने हातबुक्याने मारहान करून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीतांविरुध्द कलम 143,147,148,149,323,326,504 भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक पंजाबराव परघणे हे करीत आहे.

.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर